निरीक्षक (गट-ब), राज्य उत्पादन शुल्क संवर्गातील अधिकाऱ्यांना महसूली संवर्ग बदलून देणेबाबत व त्यांच्या पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्रमांक- इएसटी-२७१८/ प्र.क्र.१६९/राउशु-१,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१९.

वाचा: शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/कार्या.१२, दि.१५.०६.२०१७.

शासन आदेश:

निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (गट-ब) या संवर्गातील खालील **स्तंभ २** मधील नमूद अधिकाऱ्यांना "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५ मधील नियम १२ अन्वये निरीक्षक, राउशु या पदावरील पदोन्नतीच्या वेळी वाटप झालेल्या महसूली विभागामध्ये किमान एक वर्षाची सेवा केल्यानंतर नियम १३ अन्वये त्यांच्या विनंतीनुसार बदल करण्यात येत असून त्यांची पदस्थापना खालील स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	वाटप झालेला महसूली संवर्ग	बदली करुन देण्यात आलेला महसूली संवर्ग	पदस्थापना
१	श्री. सुभाष हनवते	नागपूर	कोकण-२	व्ही विभाग, मुंबई उपनगरे.
२	श्री. आनंदा दादू कांबळे	औरंगाबाद	कोकण-२	विभागीय भरारी पथक, कोकण विभाग, ठाणे.
३	श्री. शहाजी आबा पाटील	अमरावती	पुणे	सातारा शहर

२. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात येत असून, त्यांना देण्यात आलेल्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होउन पदाचा कार्यभार घ्यावा.

३. सदर आदेशाच्या दिनांकापासून उक्त अधिकारी बदलीच्या ठिकाणी विहीत कालावधीमध्ये रूजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

४. सदर आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९२११०३६२०६४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P H WAGDE

Digitally signed by P H WAGDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894ed c0ea69760a3c1561515a6bf87, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=P H WAGDE
Date: 2019.09.21 12:17:23 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) सर्व विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
६) सर्व संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
७) संबंधित अधिकारी.
८) कार्यासन अधिकारी, राउशु-२ व राउशु-३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (राउशु-१).